# प्रतिज्ञापत्र

॥ **नारायण सुमंत यांच्या गेय कवितेचा अभ्यास** ॥ (‘नारायण पासष्टी’च्या अनुषंगाने)या विषयावरील प्रस्तुत लघुप्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या एम. फिल. (मराठी) पदवी परीक्षेसाठी लिहिला आहे.

हा लघुप्रबंध अथवा त्याचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही, कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण : कोल्हापूर

दिनांक : १२ जानेवारी, २००९

अभ्यासक

**(संतोष शाहू बोंगाळे)**

**डॉ. गिरीश मोरे**
अधिव्याख्याता, मराठी विभाग,
राजर्षी शाहू कला व वाणिज्य
महाविद्यालय, रुकडी,
ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर.

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **संतोष शाहू बोंगाळे** यांनी ।। **नारायण सुमंत यांच्या गेय कवितेचा अभ्यास** ।। ('नारायण पासष्टी'च्या अनुषंगाने) या विषयावरील लघुप्रबंधाचे संशोधन कार्य माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे. हा लघुप्रबंध स्वतंत्ररीत्या लिहिलेला असून यापूर्वी कोणत्याही विद्यापीठात अन्य परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

सदर लघुप्रबंध 'आधुनिक मराठी काव्य' या अभ्यासक्षेत्रात समाविष्ट होतो.

सदर लघुप्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या एम.फिल (मराठी) पदवी परीक्षेसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

ठिकाण : कोल्हापूर

दिनांक : १३ जानेवारी, २००९

मार्गदर्शक

**डॉ. गिरीश मोरे**

दादा आणि आईस...

तात्या आणि ताईस...

# ऋणनिर्देश

शिवाजी विद्यापीठाच्या एम. फिल (मराठी) पदवी परीक्षेसाठी 'नारायण सुमंत यांच्या गेय कवितेचा अभ्यास' ('नारायण पासष्टी'च्या अनुषंगाने) या विषयावरील लघुप्रबंध सादर करताना मला अत्यानंद होत आहे. या निमित्ताने संशोधनाच्या प्रवासाविषयी, संशोधनाच्या कामी ज्यांचे सहकार्य व प्रेरणा लाभल्या त्यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

मला लहानपणापासूनच कविता वाचनाची आवड होती. पिंपळखुंटे या माझ्या गावातील कवी नारायण सुमंत यांच्या कवितांविषयी पहिल्यापासूनच आकर्षण व आवड होती. गेय कवितांचे गायन करताना सुमंतांना मी अनेक वेळा पाहिले आहे. त्यांच्या कवितांनी माझे मन भारून टाकले. शिवाजी विद्यापीठामध्ये शिक्षणाच्या उद्देशाने आल्यानंतर नारायण सुमंत यांच्या गेय कवितांचा अभ्यास करणे महत्त्वाचे वाटले व तोच विषय मी डॉ. गिरीश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली एम.फिल पदवी परीक्षेच्या संशोधनासाठी निवडला.

डॉ. गिरीश मोरे सरांनी वेळोवेळी मार्गदर्शन तर केलेच परंतु माझ्या वाङ्मयीन जाणीवा विकसित केल्या व सुमंतांच्या कवितेचा अभ्यास करण्याची दिशा व दृष्टी दिली. या संशोधनासाठी सरांचा मोलाचा वाटा आहे. सरांच्या स्नेहपूर्ण मार्गदर्शनामुळेच मी हा लघुप्रबंध पूर्ण करू शकलो. आदरणीय मार्गदर्शक डॉ. गिरीश मोरे आणि त्यांचे कुटुंबीय यांचे ऋण शब्दांत व्यक्त न करता मी त्यांच्या पूर्ण ऋणातच राहणे पसंत करतो.

मी ज्या महाविद्यालयात पदवी शिक्षण घेतले त्या के. एन. भिसे, आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कुर्डूवाडी महाविद्यालयाचे गुरुवर्य प्रा. राम इवरे सर, प्रा. प्रकाश कांबळे यांनी वेळोवेळी केलेल्या सूचना व मार्गदर्शन बहुमोल आहे. तसेच एम. ए. ला शिवाजी महाविद्यालय, बार्शी येथे शिक्षण घेताना डॉ. सौ. रेवडकर, प्रा. राजेंद्र दास, डॉ. बिरा पारसे यांचेही मार्गदर्शन या कामी उपयोगी पडले. तसेच न्यू इंग्लिश स्कूल, पिंपळखुंटे या माझ्या गावातील हायस्कूलच्या गुरुजनवर्गांची वेळोवेळी प्रबंधाविषयीची चौकशी व प्रेरणा या संशोधनकामी आल्या. त्यांचेही मी आभार मानतो.

आदरणीय असलेले नारायण सुमंत यांनी मला संशोधन कार्यासाठी अत्यंत मोलाची मदत तर केलीच व त्यांच्याशी झालेल्या मनमोकळ्या गप्पा याही खूप उपयोगी पडल्या. त्यांच्या ऋणातून मी मुक्त होऊ इच्छित नाही. तसेच आटपाडीचे प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी, प्रा. चंद्रकुमार नलगे, प्रा. डॉ. जी. पी. माळी यांचेही कृपाशीर्वाद व सहकार्य अतुलनीय आहे.

शिवाजी विद्यापीठातील मराठी विभाग प्रमुख डॉ. विश्वनाथ शिंदे,

डॉ. रणधीर शिंदे, डॉ. रवींद्र ठाकूर, प्रा. हिमांशू स्मार्त, डॉ. कृष्णा किरवले यांनी शंकासमाधान करून अनमोल मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणा व प्रोत्साहन माझ्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. तसेच लिपिक शिरगावकर मॅडम व कर्मचारी मिनाक्षी स्वामी यांच्या सहकार्याबद्दल आभार !

वास्तविक मला तसा कोणताही पारंपरिक शैक्षणिक वारसा लाभलेला नाही. इयत्ता सातवीपर्यंत शिक्षण झालेले माझे वडील (दादा) व आई यांनी कार्यपूर्तीसाठी प्रतिकूल परिस्थितीतही संकटाशी धैर्याने व चिकाटीने लढण्याचे सामर्थ्य मला दिले. आई अशिक्षित पण अत्यंत प्रेमळ व मुळातच स्वाभिमानी. आईचे आशीर्वाद व वडिलांचे कर्तृत्व ही माझी अक्षय प्रेरणादायी शिदोरी आहे. त्यांच्या अपार कष्टांमुळेच आम्ही भावंडे शिक्षित झालो. माझ्या प्रत्येक कार्यात रस दाखवणारा, सतत मदत करणारा माझा लहान भाऊ आत्माराम (तात्या) व मी गावी येऊन कधी भेटतो याची वाट पाहणारी प्रेमस्वरूप माझी लहान बहीण सुवर्णा (ताई) यांची खूप मदत झाली.

तसेच शिवाजी विद्यापीठातील माझे जिवलग मित्र सचिन आवताडे, विजय बेदरे, संतोष काळे, सचिन धायगुडे, सचिन रूपनर, सिद्धेश्वर खरात, श्रीकृष्ण पडळकर सर, विजय शिंदे सर, पद्माकर वानखडे, अनिल मकर, तात्या केसकर, सुनील मोटे याबरोबरच सुरेखा घारगे, स्वाती मोरे, ज्योती मोरे, वैशाली बामणे या मैत्रिणींचे सहकार्य लाभले. आर्थिक अडचण कधीच भासू न देणारे माझ्या गावातील मित्र नागेश, शंकर, साईनाथ, समाधान, संतोष, गणेश, प्रदीप, संदीप, बाळासाहेब, प्रवीण यांचीही सतत आठवण राहील.

शिवाजी विद्यापीठ येथील बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाचे ग्रंथपाल व कर्मचारीवृंद यांनी संशोधन सामग्री, आवश्यक पुस्तके वेळोवेळी अत्यानंदाने उपलब्ध करून दिली. त्याबद्दल त्यांचेही आभार मानणे मी माझे कर्तव्य समजतो. तसेच पिंपळखुंटे या माझ्या गावातील कै. सौ. सुशिलाबाई सार्वजनिक वाचनालयाचाही मला पुरेपूर फायदा झाला.

'सायली कॉम्प्युटर' चे श्री. अमर धनवडे सर व त्यांची धर्मपत्नी राजश्री धनवडे यांनी संगणक टंकलेखनासाठी घेतलेले अथक् परिश्रम पाहता मी त्यांचे ऋण मानतो. या कामी त्यांनी जो उत्साह दाखवून लघुप्रबंधाचे काम वेळेत पूर्ण करून दिले त्याबद्दल मी मन:पूर्वक कृतज्ञ आहे.

या सर्वांच्या प्रेरणांमुळे व सहाकार्यामुळेच हा लघुप्रबंध पूर्ण होऊ शकला. या सर्वांविषयी मी अत्यंत कृतज्ञ आहे. पुन्हा एकदा या सर्वांच्या सहकार्याबद्दल अंत:करणापासून आभार !

**- संतोष बोंगाळे**

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | भूमिका | |
| १. प्रकरण पहिले | मराठी गेय कवितेचे स्वरूप आणि वाटचाल | १ ते ६२ |
| २. प्रकरण दुसरे | नारायण सुमंत यांच्या गेय कवितेची आशयसूत्रे | ६३ ते १३३ |
| ३. प्रकरण तिसरे | नारायण सुमंत यांच्या गेय कवितेचे वाङ्मयीन विशेष | १३४ ते १६७ |
| ४. प्रकरण चौथे | नारायण सुमंत यांच्या गेय कवितेचे वेगळेपण | १६८ ते १८२ |
| ५. प्रकरण पाचवे | उपसंहार | १८३ ते १८८ |
| ६. परिशिष्ट 'अ' | संदर्भग्रंथ सूची | १८९ ते १९३ |
| परिशिष्ट 'ब' | नियतकालिके सूची | १९४ |
| परिशिष्ट 'क' | नारायण सुमंत यांची मुलाखत | १९५ ते १९८ |

# भूमिका

# भूमिका

सभोवतीच्या घटितांना दिलेली लेखनरूप प्रतिक्रिया म्हणजे साहित्य असे म्हणता येईल. भाषिक रचनेमुळे गद्य आणि पद्य असे प्रकार पडतात. कवितेचा समावेश पद्यात केला जातो. कवितेने मानवाची सोबत आदिमकाळापासून केली आहे. तिचा उत्तरोत्तर होत गेलेला प्रवास महत्त्वपूर्ण आहे.

मराठी कवितेने मानवी मनाला पहिल्यापासूनच भुरळ घातली आहे. अनेक कवींनी समाज जीवनाला कवितेमध्ये बंदिस्त करण्याचा प्रयत्न केला आहे. नारायण सुमंतांच्या कवितांविषयी मला सुरुवातीपासूनच उत्सुकता होती. त्यांचे एकूण चार काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यामध्ये 'रानभैरी' (१९८३), 'वृक्षवेद' (१९९३), 'सातबारा' (२००२) व 'नारायण पासष्टी' (२००६) या काव्यसंग्रहाचा समावेश होतो.

नारायण सुमंतांच्या गेय कवितेने संतसाहित्य व लोकसाहित्याचा प्रभाव स्वीकारलेला दिसतो. सामाजिक वास्तवाचे भान राखणारी त्यांची गेय कविता कृषकांचे दुःख मांडते. अन्यायाविरुद्ध बंड पुकारते. हे करीत असताना त्यांची कविता गेयतेला सोबत घेताना दिसते. या दृष्टीने त्यांच्या 'नारायण पासष्टी' या संपूर्ण गेय असलेल्या काव्यसंग्रहाचा अभ्यास करणे महत्त्वाचे वाटले. डॉ. गिरीश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली **'नारायण सुमंत यांच्या गेय कवितेचा अभ्यास'** ('नारायण पासष्टी' च्या अनुषंगाने) हा एम. फिल. पदवी परीक्षेसाठी विषय निवडला.

प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी समाजवाङ्मयीन पद्धतीचा अवलंब केला आहे. त्यासाठी अभ्यासाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे निश्चित केली आहेत. १) नारायण सुमंतपूर्व मराठी गेय कवितेचा आढावा घेणे. २) नारायण

सुमंतांच्या गेय कवितेमधील समाजवास्तव शोधणे. ३) नारायण सुमंतांच्या गेय कवितेचे वाङ्मयीन विशेष शोधणे. ४) नारायण सुमंतांच्या गेय कवितेचे वेगळेपण शोधणे.

प्रस्तुत विषयाच्या अभ्यासासाठी लघुप्रबंधाची प्रकरण विभागणी पुढीलप्रमाणे केले आहे.

प्रकरण १. मराठी गेय कवितेचे स्वरूप आणि वाटचाल

प्रकरण २. नारायण सुमंत यांच्या गेय कवितेची आशयसूत्रे

प्रकरण ३. नारायण सुमंत यांच्या गेय कवितेचे वाङ्मयीन विशेष

प्रकरण ४. नारायण सुमंत यांच्या गेय कवितेचे वेगळेपण

प्रकरण ५. उपसंहार

शेवटी परिशिष्टामध्ये संदर्भग्रंथ सूची देऊन नारायण सुमतांची मुलाखत देण्यात आली आहे.